ePaper
वर्ष - 9 । अंक -127 | UDYAM-MH-26-0158827

## शरद पवार NDA मध्ये सामील होणार? काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांचा दावा



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- टीम इंडियाचा दमदार विजय!
- सूर्यकुमार यादव मला खूप मेसेज करायचा
- बांगलादेशशी संबंध सुधारणार?
- पश्चिम बंगालमध्येही घुसखोरीचा मुद्दा


www.mahaenews.com | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**पुणे महापालिका निवडणुक** राष्ट्रवादी (अजित पवार गट) उमेदवारी यादीमुळे राजकीय भूकंप

# पालकमंत्री पुण्याचे की गुन्हेगारांचे?

## 'गुन्हेगारीमुक्त पुणे'चा अजित पवारांचा वादा निवडणुकीतच गायब!

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यातील "पुणे गुन्हेगारीमुक्त करणार", "कोयता गँगचा बंदोबस्त करणार", "गुन्हेगारांना टायरमध्ये घालणार" अशा आक्रमक घोषणा देणारे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार आता स्वतःच आपल्या शब्दांवरून फिरले आहेत का? असा थेट आणि जळजळीत सवाल पुणेकरांच्या मनात निर्माण झाला आहे. कारण राज्यभरातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी पुण्यात जे राजकीय नाट्य घडले, त्यामुळे 'गुन्हेगारीमुक्त पुणे' हा नारा निव्वळ भाषणापुरताच मर्यादित असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीत कुख्यात गुंड, हत्या प्रकरणातील आरोपी, गँगवॉरशी संबंधित व्यक्ती आणि थेट तुरुंगात असलेले उमेदवार यांचा समावेश असल्याने पुण्यात प्रचंड खळबळ उडाली आहे.

### कुख्यात गुंड बापू नायरला थेट उमेदवारी!

या वादाच्या केंद्रस्थानी आहे पुण्यातील कुख्यात गुंड बापू उर्फ कुमार प्रभाकर नायर. प्रभाग क्रमांक ३९ मधून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या तिकीटावर बापू नायर याने अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. विशेष म्हणजे, २०२० मधील युवासेना नेते दीपक मारटकर हत्या प्रकरणात बापू नायरचे नाव समोर आले होते. या हत्येचा कट रचल्याच्या संशयावरून त्याला अटकही झाली होती.

२०२१ मध्ये जामिनावर बाहेर आल्यानंतर पुन्हा तो या प्रकरणात अडकला आणि अखेर २०२४ मध्ये जामिनावर सुटला. अशा गंभीर गुन्ह्यांची पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला थेट महापालिका निवडणुकीत उतरवणे, हा केवळ राजकीय निर्णय नसून कायद्याच्या आणि नैतिकतेच्या चौकटीवर घाला घालणारा प्रकार असल्याचे मत राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

### गँगवॉरची पार्श्वभूमी असलेल्या आंदेकर टोळीला राजकीय बळ

इतकेच नव्हे तर पुण्यातील कुख्यात आंदेकर टोळी प्रकरणातही राष्ट्रवादीने आश्चर्यकारक पाऊल उचलले आहे. आयुष कोमकर हत्या प्रकरणात सध्या तुरुंगात असलेल्या सोनाली आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर यांना प्रभाग क्रमांक २३ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. या दोन्ही उमेदवार तुरुंगातूनच निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे.

एकीकडे कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी असलेल्या पालकमंत्र्यांच्या पक्षाकडून तुरुंगात असलेल्या आरोपींना एबी फॉर्म देणे, हा प्रकार सामान्य पुणेकरांच्या पचनी पडणारा नाही.

### गजा मारणे गँगची एंट्री

याशिवाय, पुण्यातील आणखी एक कुख्यात गुंड गजा मारणे याच्या पत्नी जयश्री मारणे यांनाही अजित पवार गटाने उमेदवारी दिली आहे. गजा मारणे गँगवर खंडणी, धमकी, मारहाण, दहशत निर्माण करण्याचे अनेक गुन्हे दाखल आहेत. अशा पार्श्वभूमीतील कुटुंबाला राजकीय आश्रय दिल्याने पुण्यातील व्यापारी, व्यावसायिक आणि सामान्य नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

### 'गुन्हेगारांना टायरमध्ये घाला'... मग आता त्यांनाच पालिकेत का?

काही महिन्यांपूर्वीच अजित पवार यांनी पुण्यातील गुन्हेगारीवर बोलताना अत्यंत जहरी शब्दांत इशारे दिले होते. "गुन्हेगारांना टायरमध्ये घाला", "कोयता गँग दिसली तर तुमची गत काय होईल ते बघा", "पोलिसांना मोकळे हात दिले आहेत" अशा एक ना अनेक घोषणा त्यांनी केल्या होत्या.

मात्र आज त्याच अजित पवारांच्या पक्षाकडून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींनाच महापालिकेत पाठवण्याचा प्रयत्न होत असल्याने विरोधकांनी दादांवर टीकेची झोड उठवली आहे. "हे दुहेरी धोरण नाही का?", "हेच गुन्हेगार काल समाजासाठी धोका होते, आज ते लोकप्रतिनिधी कसे?" असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### पुणेकर भयभीत; शहराची प्रतिमा धोक्यात

पुणे हे शहर आज आयटी हब, शिक्षणाचे केंद्र आणि सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते. देश-विदेशातील गुंतवणूक, विद्यार्थी आणि व्यावसायिक पुण्याकडे आकर्षित होत असताना, महापालिका निवडणुकीत गुन्हेगारी टोळ्यांचा वाढता सहभाग ही अत्यंत गंभीर बाब आहे.

खंडणी, हत्या, धमकावणे, दहशत निर्माण करणे अशा गुन्ह्यांशी संबंधित व्यक्तींना राजकीय व्यासपीठ मिळाल्याने सामान्य मतदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. "मतदान करायला जाताना दबाव येणार का?", "लोकशाही प्रक्रियेवर गुन्हेगारीचा प्रभाव वाढतोय का?" असे प्रश्न पुणेकर विचारत आहेत.

### शेवटचा सवाल – पालकमंत्री पुण्याचे की गुन्हेगारांचे?

या सगळ्या पार्श्वभूमीवर आता एकच प्रश्न उरतो – अजित पवार हे पुण्याचे पालकमंत्री आहेत की गुन्हेगारांचे? 'गुन्हेगारीमुक्त पुणे'चा वादा हा निवडणुकीपुरताच मर्यादित होता का? की सत्तेसाठी आणि गणितांसाठी पुणेकरांच्या सुरक्षिततेशी तडजोड केली जात आहे?

महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने उघड झालेल्या या वास्तवामुळे अजित पवारांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, याची किंमत येत्या निवडणुकीत मतदारच ठरवतील, हे मात्र नक्की.

- कुख्यात गुंड, हत्या प्रकरणातील आरोपी आणि तुरुंगात असलेले उमेदवार
- पुणे महापालिका निवडणुकीत गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना तिकीट
- कुख्यात गुंड बापू नायरला राष्ट्रवादीची अधिकृत उमेदवारी
- तुरुंगात असलेल्या सोनाली-लक्ष्मी आंदेकर यांना एबी फॉर्म
- 'गुन्हेगारांना टायरमध्ये घालू' म्हणणाऱ्या दादांचे नेमके काय धोरण?
- सामान्य पुणेकर भयभीत; विरोधकांचा तीव्र हल्लाबोल

## परीक्षा २६ एप्रिल रोजी

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे काम कौतुकास्पद

# शिष्यवृत्ती परीक्षेचे वेळापत्रक जाहीर!

### ऑनलाइन अर्ज करता येणार

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे इयत्ता चौथी व सातवी या वर्गांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी आयोजित केली जाणार आहे. या परीक्षेसाठी नियमित शुल्कासह २ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे.**




राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी परीक्षेची अधिसूचना प्रसिद्ध केली. राज्यातील गुणवान विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, स्पर्धात्मकतेसाठी प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करण्यात येते. पूर्वी ही परीक्षा चौथी आणि सातवी या इयत्तांसाठी घेतली जात होती. मात्र, शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) तरतुदी लक्षात घेऊन २०१६-१७पासून ही परीक्षा पाचवी आणि आठवी या वर्गांसाठी लागू करण्यात आली. पाचवी आणि आठवीला शिष्यवृत्ती परीक्षा लागू केल्यापासून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर, शिष्यवृत्ती परीक्षा पूर्वीप्रमाणेच चौथी आणि सातवी या वर्गांसाठी आयोजित करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला. त्यामुळे यंदा पाचवी, आठवीसह चौथी आणि सातवी या इयत्तांसाठीही स्वतंत्रपणे शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार राज्य परीक्षा परिषदेतर्फे पाचवी, आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा २२ फेब्रुवारी रोजी आयोजित केली जाणार आहे. तर, चौथी आणि सातवीची परीक्षा कधी होणार, याकडे पालक, शिक्षकांचे लक्ष लागले होते.या पार्श्वभूमीवर, परीक्षा परिषदेने दिलेल्या माहितीनुसार, चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी राज्यभरात एकाच वेळी होणार आहे. सकाळी अकरा ते बारा या वेळेत प्रथम भाषा व गणित या विषयाची, तर दुपारी दोन ते साडेतीन या वेळेत तृतीय भाषा व बुद्धिमत्ता चाचणी या विषयाची परीक्षा घेण्यात येणार आहे. नियमित शुल्कासह विद्यार्थ्यांचे अर्ज २ फेब्रुवारीपर्यंत भरता येणार आहेत. तर, ३ ते १७ फेब्रुवारी या कालावधीत विलंब शुल्कासह, १८ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत अतिविलंब शुल्कासह, २३ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत अतिविशेष विलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहे. २८ फेब्रुवारीनंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने अर्ज भरता येणार नाही. पाचवी, आठवीच्या परीक्षेसाठी संलग्नता शुल्क भरलेल्या चौथी, सातवीसाठी पुन्हा संलग्नता शुल्क भरण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परीक्षा शुल्क आणि अन्य नियमांचा तपशील HTTP://WWW.MSCEPUNE.IN या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.शिष्यवृत्ती परीक्षेबाबत शिष्यवृत्ती परीक्षा ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न स्वरूपाची असते. शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित शाळांत चौथी आणि सातवीत शिकत असलेले विद्यार्थी ही परीक्षा देण्यासाठी पात्र आहेत. सर्व प्रवर्गांतील चौथीच्या विद्यार्थ्याचे वय १ जून २०२५ रोजी १० वर्षांपेक्षा, तर सातवीच्या विद्यार्थ्यांचे वय १३ वर्षांपेक्षा जास्त नसावे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अनुक्रमे १४ आणि १७ वर्षांपर्यंतची सवलत देण्यात आली आहे. वयोमर्यादेपेक्षा जास्त वय असलेल्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे इयत्ता चौथी व सातवी या वर्गांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी आयोजित केली जाणार आहे. या परीक्षेसाठी नियमित शुल्कासह २ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे.अनुराधा ओक यांनी परीक्षेची अधिसूचना प्रसिद्ध केली. राज्यातील गुणवान विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, स्पर्धात्मकतेसाठी प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करण्यात येते.

### आठवीला शिष्यवृत्ती परीक्षा लागू

शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) तरतुदी लक्षात घेऊन २०१६-१७पासून ही परीक्षा पाचवी आणि आठवी या वर्गांसाठी लागू करण्यात आली. पाचवी आणि आठवीला शिष्यवृत्ती परीक्षा लागू केल्यापासून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर, शिष्यवृत्ती परीक्षा पूर्वीप्रमाणेच चौथी आणि सातवी या वर्गांसाठी आयोजित करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला.

# शिरूरमध्ये आणखी एक बिबट्या जेरबंद

## शिरूरमध्ये वन विभागाने आतापर्यंत 29 बिबटे पकडले

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिरूर तालुक्यातील बिबट्यांच्या वावर कायम असून मंगळवारी सकाळी आणखी एक बिबट्या जेरबंद करण्यात आला. बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी वन खात्याने विविध भागात पिंजरे लावले असून, आतापर्यंत २९ बिबटे जेरबंद करण्यात आले आहेत.**



चांडोह येथील हेमंत दिलीप चापुडे यांच्या शेतात लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला झाला. ती मादी असून, तिचे वय तीन वर्षे आहे. तिला माणिकडोह बिबट निवारा केंद्रात दाखल करण्यात आल्याचे तालुका वनाधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी सांगितले.दरम्यान, शिरूर तालुक्यात फाकडे आणि चांडोह या ठिकाणी लावलेल्या पिंजऱ्यात सोमवारी दोन बिबटे जेरबंद झाले. बिबट्यांच्या हल्ल्यात दोन मुले आणि एक ज्येष्ठ महिला मृत्युमुखी पडल्यानंतर वन विभागाने ठिकठिकाणी पिंजरे लावले आहेत. फाकटे येथे पोपट फिरोदिया यांचे शेतात लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला. ती मादी असून, तिचे वय ६ वर्षे आहे. चांडोह येथे भाऊ मारुती पानमंद यांच्या शेतात लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या सापडला. तीदेखील मादी असून, चार वर्षांची आहे.

दोघींना माणिकडोह बिबट निवारा केंद्रात पाठविण्यात आले आहे.दरम्यान, जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर या चार तालुक्यांमधील वन परिक्षेत्रामध्ये दीड महिन्यांत ६८ बिबटे वन विभागाने पकडले आहेत.

जुन्नर वन परिक्षेत्रातील पिंपरखेड आणि जांबूत गावांमध्ये एकाच बिबट्याने तीन जणांचा बळी घेतल्याची घटना घडली होती. त्यानंतर नागरिकांनी पुणे-नाशिक महामार्गावर आंदोलन केले बिबट्यांना पकडण्यासाठी वन विभागाला निर्देश दिले होते. त्यासाठी १३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला.

### १३ कोटी रुपयांचा निधी

शिरूर तालुक्यांमध्ये सुरक्षितता उपाययोजनेंतर्गत ४०० पिंजरे, ४०० आपदा मित्र, अतिसंवेदनशील गावांत 'बिबट कृती दल' स्थापन करून बिबटे पकडण्याची मोहीम हाती घेतली. तसेच ३,३०० नेक गार्ड वाटप करून ५ ठिकाणी 'अनायडर्स मशीन' यंत्रणा कार्यान्वित केली. मेंढपाळ आणि ऊसतोड कामगारांसाठी ४१० सौर दिवे व ४१० टेंट वाटप करण्यात आले. २४ तास मदत कक्ष, स्थानिक नागरिकांच्या मदतीने जलद बचाव पथकांची निर्मिती केली. त्यामुळे दीड महिन्यात वन विभागाने ६८ बिबटे पकडण्यात वन विभागाच्या अधिकाऱ्यांना यश आले आहे.

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक**

## शिवसेनेचा गंभीर आरोप; शिवसेना स्व:बळावर लढणार

# भाजपने चर्चेत गुंतवून ठेवून खेळवले!

## पिंपरी चिंचवडमध्ये शिवसेना भाजप युती तुटली

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून, शिवसेना (शिंदे गट) आणि भारतीय जनता पार्टी यांची बहुचर्चित युती अखेर तुटली आहे. युती तुटल्याची अधिकृत घोषणा शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी पत्रकार परिषदेत केली. येणारी महापालिका निवडणूक शिवसेना स्वबळावर लढवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**



आरोप करताना खासदार बारणे म्हणाले की, भाजपच्या नेत्यांनी शिवसेनेला चर्चेत गुंतवून ठेवले आणि शेवटपर्यंत खेळवत ठेवले. त्यामुळेच युती फिसकटली असून शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

खासदार बारणे यांनी सांगितले की, पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक १५ जानेवारी रोजी होत असून उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. मात्र, आजपर्यंत भाजपकडून एकही अधिकृत उमेदवार जाहीर करण्यात आलेला नाही. गेल्या काही दिवसांपासून भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात युतीबाबत सातत्याने चर्चा सुरू होती. तीन ते चार वेळा दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये बैठका झाल्या, मात्र प्रत्येक वेळी जागावाटपावरून मतभेद निर्माण झाले. प्रारंभी जागावाटपाचे गणितच जुळले नाही. त्यानंतर भाजपकडून एका प्रभागातील उमेदवार बदलण्याची मागणी करण्यात आली. ही मागणी शिवसेनेला मान्य नसल्याने चर्चेत ताण निर्माण झाला. "आम्ही युती टिकवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. मात्र भाजपकडून सातत्याने नवनव्या अटी घालण्यात आल्या. त्यामुळे शेवटी युती तोडण्याशिवाय आमच्यासमोर पर्याय उरला नाही," असे बारणे यांनी स्पष्ट केले.युती तुटल्यानंतर शिवसेना (शिंदे गट) पक्षाने आता स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. "शिवसेनेचा कार्यकर्ता सक्षम आहे. जनतेचा पाठिंबा आमच्यासोबत आहे. त्यामुळे कोणत्याही युतीशिवाय आम्ही निवडणूक लढवू आणि चांगला निकाल देऊ," असा विश्वासही बारणे यांनी व्यक्त केला. दरम्यान, भाजपने शेवटच्या क्षणापर्यंत चर्चेत गुंतवून ठेवून शिवसेनेची रणनीती कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्याची भावना शिवसेना नेत्यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली. "ही केवळ युती तोडण्याची बाब नाही, तर विश्वासघाताची भावना आहे," अशी तीव्र प्रतिक्रिया शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना यांची युती तुटल्यामुळे आता राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता आहे. स्वबळावर लढणारी शिवसेना आणि स्वतंत्रपणे मैदानात उतरणारा भाजप यांच्यात थेट लढत पाहायला मिळणार आहे.

### शिवसेना स्वबळावर मैदानात

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या तोंडावर भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांची पारंपरिक युती अखेर तुटली आहे. युती व्हावी यासाठी स्वतः पुढाकार घेतल्याची माहिती शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली. मात्र, जागावाटपावर स्थानिक पातळीवर एकमत न झाल्याने स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घ्यावा लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले. खासदार बारणे म्हणाले की, शिवसेना–भाजप ही पारंपरिक युती असून महापालिका निवडणुकीतही ती कायम राहावी, यासाठी शहराध्यक्ष आणि आमदारांशी सातत्याने संपर्क साधला. तीन ते चार बैठका झाल्या. सुरुवातीला भाजपकडे २९ जागांची मागणी करण्यात आली होती. पहिल्या बैठकीत १६ जागा, त्यानंतर १३ जागांवर चर्चा झाली. सोमवारी झालेल्या शेवटच्या बैठकीत दहा जागांची मागणी करण्यात आली. मात्र, यावर कोणताही सकारात्मक निर्णय झाला नाही.

दुपारपर्यंत आमदार शंकर जगताप यांच्या संपर्कात होतो. मात्र, कार्यकर्ते ऐकत नसल्याचे त्यांनी सांगितल्याने ऐनवेळी निर्णय घ्यावा लागला, असे बारणे यांनी सांगितले.

# शिक्षण विश्व : जिल्हास्तरीय क्रीडास्पर्धांना रंगत

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळ क्रीडामहोत्सवात चार हजार विद्यार्थी खेळाडूंचा सहभाग

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**: पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय क्रीडामहोत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. या क्रीडामहोत्सवात जिल्ह्यातील विविध शाळा आणि महाविद्यालयांमधील सुमारे चार हजार विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग नोंदवला. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धांमुळे सासवड येथील वाघिरे महाविद्यालयाचे क्रीडांगण जणू क्रीडापंढरीचे रूप धारण केले होते.**



संस्थेच्या वाघोली, खानापूर, आकुर्डी, ओझर, पौड, निमगाव केतकी, सुपे, नसरापूर आणि न्हावरे या नऊ गटांमधून कबड्डी, खो खो, व्हॉलीबॉल यांसारख्या सांघिक क्रीडांसह ॲथलेटिक्स प्रकारातील विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या सर्व शाखांमधील सुमारे पंधरा हजार खेळाडूंनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. गटस्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेल्या खेळाडूंनी जिल्हास्तरीय स्पर्धेत आपले कौशल्य सादर केले.

सासवड येथील वाघिरे महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर दोन दिवस सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धांचा थरार पाहायला मिळाला. खेळाडूंची जिद्द, कौशल्यपूर्ण खेळी, डावपेच आणि सांघिक एकात्मता याचे उपस्थित प्रेक्षकांनी भरभरून कौतुक केले. अनेक स्पर्धांमध्ये अटीतटीचे सामने झाले आणि शेवटच्या क्षणापर्यंत निकालाची उत्कंठा कायम होती. या क्रीडामहोत्सवाचे आयोजन संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव अड संदीप कदम, खजिनदार अड मोहनराव देशमुख, उपसचिव एल एम पवार, सहसचिव ए एम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. रजिस्ट्रार सिताराम अभंग, अधिक्षक किरण देशपांडे, विशेष कार्यकारी अधिकारी प्रमोद जाधव, अकाऊंटंट गोरख सोंडकर, क्रीडा विभागाचे समन्वयक डॉ योगेश पवार, क्रीडा अधिकारी शाम भोसले, संतोष पठारे, आदिनाथ पाठक यांनी नियोजनाची जबाबदारी सांभाळली. सासवड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पंडित शेळके, शेठ गोविंद रघुनाथ साबळे फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्या राजश्री चव्हाण तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शाळांचे मुख्याध्यापक, क्रीडाशिक्षक, प्राध्यापक आणि सेवकांनी या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

चौदा, सतर, एकोणीस वर्षे वयोगट तसेच महाविद्यालयीन गटात घेण्यात आलेल्या धावणे, उड्या, फेक प्रकार, रिले, कबड्डी, खो खो, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ आणि योगासने या स्पर्धांमध्ये मुला मुलींनी उल्लेखनीय कामगिरी केली. विविध शाळा आणि महाविद्यालयांतील खेळाडूंनी मिळवलेल्या यशामुळे त्यांच्या संस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

हा क्रीडामहोत्सव विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना चालना देणारा, सांघिक भावना वाढवणारा आणि जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा ठरला. यशस्वी आयोजनामुळे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या क्रीडाविषयक उपक्रमांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.




# आपल्या शहाराप्रती प्रेम असायला हवं

**मागील अनेक काही वर्षापासुन देशाचे राजकारण हे गढूळ होत चाललय परंतु त्यात महाराष्ट्राचं राजकारण एक आदर्श घेऊन चालत होत जे की आज मितीला संपूष्टात येतं आहे असे आपण आज पाहतोय. तर काय तोच त्या पक्षात सामील होऊन त्या पक्षाचे गुण गान करतांना दिसतोय, असे एक नाही तर शेकडो उदाहरणं आपल्याला आपल्या सभौवताली पाहायला मिळतील.**



“सरकारें आएंगी, जाएंगी, पार्टियां बनेंगी, बिगड़ेंगी, मगर ये देश रहना चाहिए” और “देश का लोकतंत्र अमर रहना चाहिए” - अटल बिहारी वाजपेयी देशाचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचं स्पष्ट मत होते की कुठलीही पार्टी तोडून जर सत्ता मिळत असेल तर त्या सत्तेला चिमट्याने सुद्धा स्पर्श करणार नाही असे अटलजीचे आदर्श विचार आज आपल्याला देशात कुठल्याही पार्टीत सोडा त्यांच्या स्वतःच्या पार्टीतसुद्धा बघायला मिळत नाहीत. मागील अनेक काही वर्षांपासुन देशाचे राजकारण हे गढूळ होत चाललय परंतु त्यात महाराष्ट्राचं राजकारण एक आदर्श घेऊन चालत होत जे की आज मितीला संपूष्टात येतं आहे असे आपण आज पाहतोय. कारण कालपर्यंत शिव्यांची लाखोळी वागणारा नेता आणि आज बघतो तर काय तोच त्या पक्षात सामील होऊन त्या पक्षाचे गुण गान करतांना दिसतोय, असे एक नाही तर शेकडो उदाहरणं आपल्याला आपल्या सभौवताली पाहायला मिळतील. उदाहरणं जर घ्यायची झाली तर कालचे नाशिक येथील निष्ठावंत मनसैनिक दिनकर पाटील आज भाजपवासी कसे काय झाले, पुण्याचे राष्ट्रवादीचे जगताप कॉंग्रेसवासी तर पिढ्यानंपिढ्या ज्यांच्या रक्तात कॉंग्रेसचं भिनलेली आहे असे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण आज भाजपात आपली निष्ठा सिद्ध करतायत, खरंच अश्या कुठल्या अडचणी असतील यांच्या मागे-पुढे त्या त्यांनाच ठाऊक, काही ठिकाणी निश्चितच कुठली तरी अशी विवश करणारी कारण असतील जी की सार्वजनिक करताच येतं नसतील, परंतु इथे प्रश्न उभा होतो तो निष्ठावंतांचा कारण आपल्या सत्तेच्या सोयीने आणलेल्या नेत्याकरिता आपण ज्यांनी इतके वर्ष पक्षांकारिता दिलीत त्या निष्ठावंत कार्यकर्त्यावर तर निश्चित अन्याय करतोय याची जाणीव व्हायला हवी, ज्याची आपल्या कार्यकर्त्याप्रती निष्ठा नाही त्यांची पक्ष आणि देशाप्रती काय निष्ठा असेल ही भाबडी आशा बाळगनेच चुकीचे ठरेल. कारण आज मितीला युती आघाडीत जमलं नाही म्हणून त्यांच्याच विरोधात बंडखोरी करून तिसरी आघाडी तय्यार होते आणि रात्रीतूनच संपुष्टात येते, परंतु इथे फरपट होते ती याच निष्ठावंत कार्यकर्त्याची. निष्ठेच्या बाबतीत थोडे मागे जाऊन पाने उलटली तर गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख यांच्या सारखी एक ना अनेक उदाहरणे सापडतील स्व. गोपीनाथ मुंडे यांच्यावर अनेकवेळा राजकीय गळचेपीचा प्रसंग आला परंतु त्यांनी अश्यावेळी कॉंग्रेसनी विलासरावांच्या माध्यमातून दाखवलेली स्वागताच्या पायघड्या पक्षाप्रती असलेले निष्ठेचे कारण पुढे करत त्यांनी स्पष्ट नकारल्या, विलासराव देशमुख व गोपीनाथ मुंडे दोघांनी निवडणूकांच्या प्रचाराकरिता अनेकवेळा एकाच हेलिकॉप्टर मधून प्रवास केला परंतु त्यांच्या निष्ठे संधर्भात कुणीही शंका नाही घेतली, काय म्हणावे अश्या निष्ठावंत राजकारण्यांना खरंच सलाम आहे अश्या राजकारण्यांना ज्यांनी आपला प्रामाणिक पणा टिकवून कार्यकर्त्यांसमोर एक उत्तम उदाहरण निर्माण केलं आणि जनतेच्या मनात आपलं अढळ स्थान निर्माण केलं. नाहीतर आज घडीला स्वार्थापोटी युत्या आघाड्याला फाटा फोडत तिसरी आघाडी निर्माण होत आणि रात्रीतूनच विलीन सुद्धा. परंतु यामुळे नेत्यांच्या निष्ठेचे पुरते वाभाडे निघतात कार्यकर्त्यांच्या नजरेत हे मात्र नक्की. आज बारामती म्हटलं की शरद पवार, अजित पवार , संगमनेर म्हटलं की बाळासाहेब थोरात , नांदेड म्हटलं की अशोक चव्हाण , लातूर म्हटलं की विलासराव देशमुख जळगांव म्हटलं की एकनाथ खडसे, नागपूर म्हटलं की नितीन गडकरी , देवेंद्र फडणवीस असं एक ना दोन नावं तुमच्या तुमच्या ओळठांवर यायला हवं आणि याकारिता तुम्हाला तसा निष्ठावंत नेता मिळायला हवा ज्याचं आपल्या शहाराप्रती प्रेम असायला हवं.

## प्रासंगिक »

### पुन्हा रेल्वे दरवाढ !

***महसूल खर्चाच्या ४० टक्क्यांपेक्षा जास्त कर्मचारी वेतन आणि पेन्शनवर जातो.***

या आर्थिक वर्षात दुसऱ्यांदा रेल्वे प्रवासी भाड्यात वाढ करण्यात आली आहे.ही वाढ भारतीय रेल्वेच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्याच्या हेतूने करण्यात आली आहे. दोनशे किलोमीटरच्या आतील प्रवास, उपनगरीय सेवा, मासिक पास यातील प्रवाशांना दिलासादिला असला आणि भाडेवाढ फारशी नसली, तरी त्यात तार्किकता कमी आहे. वातानुकुलित डब्यांतील प्रवास हा विमान प्रवासापेक्षाही महाग व्हायला लागला आहे. विमान प्रवासाकडे वळण्याची शक्यता असल्याने आता वातानुकुलित श्रेणीतून प्रवास करणाऱ्यांवर अधिक बोजा टाकणे उपयोगाचे नाही, हे रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात यायला हवे. त्यातच रेल्वेला मिळणारा महसूल हा प्रवाशी वाहतुकीतून फारच कमी असतो.मालवाहतुकीतून मिळणारा महसूल जादा असतो. अजूनही प्रवासाच्या अन्य साधनांपेक्षा रेल्वे प्रवास सर्वांत स्वस्त असतो.

हिंदी चित्रपटसृष्टीसाठी यंदाचे वर्ष कसे ठरले, याचा आढावा घेताना काही आठवड्यांपूर्वीपर्यंत ‘सैयारा’ या जेन-झेडसह लाखो प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलेल्या चित्रपटाची चर्चा प्राधान्याने होत होती; परंतु तीन आठवड्यांपूर्वी आलेल्या ‘धुरंधर’ या चित्रपटाने सारा माहोलच बदलून टाकला आहे.

# भारतीय चित्रपटांचा बदलता प्रवास!

गुप्तहेरांचे विश्व किंवा हेरगिरीच्या सुरस कथा यांविषयीची अनामिक उत्सुकता हा नेहमीच आकर्षणाचा विषय राहिला आहे. प्रेक्षकांमध्ये असणारे हे कुतूहल शमवण्याचा प्रयत्न साहित्यविश्वाने जसा केला, तशाच प्रकारे रूपेरी पडद्यावरही गुप्तहेरांवर आधारित अनेक चित्रपट येऊन गेले; पण ‘धुरंधर’ हा त्या पारंपरिक धाटणीत किंवा पठडीत बसणारा नसून त्या चौकटीपलीकडेही त्याला विविध पैलू आहेत आणि या पैलूंमुळेच चित्रपटाने तुफान यश मिळवले आहे. सुरुवातीला समाधानकारक ओपनिंग घेणाऱ्या या चित्रपटाची घोडदौड अपेक्षेपलीकडे गेल्याने निर्मति-दिग्दर्शक आणि एकूणच चित्रपटाच्या टीममध्ये आनंदाचे वातावरण आहे. यंदा सलग दुसऱ्यांदा मंगळवारी दिली जाणारी ९९ रुपयांची तिकीट सवलत ‘धुरंधर ‘साठी लागू न करण्याचा निर्णय घेण्यात आला. आजवरच्या इतिहासात असे करणारा हा पहिला चित्रपट ठरला आहे. मंगळवारच्या सवलतीची योजना दि. २२




एप्रिल २०२५ पासून सुरू झाली. त्यानंतर आतापर्यंत ‘रेड २’ आणि ‘सितारे जमीन पर’ या केवळ दोन रणवीर सिंगसह सहकलाकारांचा दमदार अभिनय, आदित्य धरचे कसलेले दिग्दर्शन आणि ऐतिहासिक घटनांची गुंतलेली गुंफण यांमुळे ‘धुरंधर’ ने बॉक्स ऑफिसवर यशाचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे.

‘धुरंधर’ ही भारतीय चित्रपटसृष्टीच्या बदलत्या प्रवाहाची नांदी आहे. आशयघन मांडणीला तांत्रिक भव्यतेची जोड मिळते, तेव्हा बॉक्स ऑफिसचे सर्व विक्रम मोडीत निघतात, हे या चित्रपटाने दाखवून दिले आहे. चित्रपटांनी पहिल्या आठवड्यात ही सवलत स्वीकारली नव्हती; मात्र या दोन्ही चित्रपटांनी दुसऱ्या आठवड्यात सवलत लागू केली होती. त्या तुलनेत ‘धुरंधर ने सलग दोन आठवडे ही सवलत नाकारत एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. ‘धुरंधर’च्या या अफाट लोकप्रियतेची मीमांसा करताना चित्रपटाचे कथानक, सादरीकरण, कलाकारांचा सशक्त अभिनय, व्हिज्युअल इफेक्टस् यांच्या बरोबरीने दिग्दर्शकांनी वर्तमानातील लोकमानसिकतेचा अचूक वेध घेतल्याचे स्पष्ट जाणवते. भारतीय चित्रपटसृष्टीत काही चित्रपट केवळ मनोरंजनासाठी येतात, तर काही चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवण्यासाठी. दिग्दर्शक आदित्य घर यांचा ‘धुरंधर’ हा चित्रपट दुसऱ्या श्रेणीत मोडतो. प्रेक्षकांनी या कलाकृतीला केवळ चित्रपट म्हणून न स्वीकारता एका राष्ट्रीय भावनेच्या रूपात स्वीकारल्याचे दिसून येते. रणवीर सिंगी मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट भारतीय गुप्तचर यंत्रणा आणि आपल्या देशाच्या इतिहासातील काळ्या कालखंडाचा अत्यंत टोकदार धांडोळा घेतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## शिंदे सेना स्वबळावर

## पुणे, नाशिक, मुंबई, भाईंदरमध्ये भाजप स्वबळावर

# बहुतांश ठिकाणी महायुती तुटली!

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महानगरपालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास आजचा दिवस शिल्लक असताना सोमवारी युती आणि आघाड्यांचे चित्र स्पष्ट झाले आहे. पुणे, नाशिक, सोलापूर, अमरावती, नवी मुंबई, मीरा भाईंदर आदी महापालिकांमध्ये भाजपा शिवसेनेची युती फिस्कटली असून, याठिकाणी भाजपा स्वबळावर लढणार आहे.**

## भाजपा स्वबळावर लढणार



राज्यात सत्तेत एकत्र असलेले भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) हे महायुतीचे त्रिमूर्ती कोल्हापूर आणि पनवेल महापालिकेतच एकत्र निवडणूक लढविणार असल्याचे दिसते. या निवडणुकीत महाविकास आघाडीही ठिकठिकाणी फुटली असून नव्या समीकरणांचा उदय झालेला दिसतो. पक्षफुटीनंतर दुरावलेले शरद पवार-अजित पवार या काका पुतण्याचे मनोमिलन झाले असून, पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी झाली आहे. नवी मुंबईत गणेश नाईक परिवार म्हणजेच भारतीय जनता पक्ष असे समीकरण असल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी त्यांचा सुरू असलेला संघर्ष जागावाटपातही डोकावला. त्यातही भाजपमध्ये गणेश नाईक आणि आमदार मंदा म्हात्रे अशीही चुरस आहे. गणेश नाईकांनी आपल्या पाठीराख्यांसाठी ८० जागा मागितल्या, तर आमदार म्हात्रे यांनी बेलापूर मतदारसंघातील प्रभागांसाठी ४० मागितल्या. एकूण जागा १११ असताना भाजपच्या या दोन नेत्यांनीच १२० जागांची मागणी केली.

या निवडणुकीत राज्याच्या राजकारणात एकत्र असलेली भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस ही महायुती आणि काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (उद्धव ठाकरे) यांची महाविकास आघाडी अनेक ठिकाणी फुटली आहे. काही ठिकाणी नवी समीकरणे तयार झाली आहेत. पुणे, नाशिक, सोलापूर, अमरावती, अकोला नवी मुंबई, मीरा भाईंदरमध्ये भाजपा आणि शिवसेनेच्या युतीची चर्चा निष्फळ ठरली आहे.

त्यामुळे शिंदे गटाला सोडण्यासाठी जागा आणायच्या कुठून या प्रश्नावर भाजप-शिवसेना युती तुटली. मुंबईतील २० जागांचा तिढा सुटला असला तरी इथेही महायुतीचा तिसरा घटक पक्ष असलेले अजित पवार स्वबळावर उत्तरल्याने महायुती भंगली. शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस उद्धव ठाकरेंसोबत असून त्यांच्या आघाडीत मनसेही सामील झाली आहे. मुंबईत मनसेमुळे महाविकास आघाडी तुटली आणि काँग्रेस स्वबळावर उत्तरली आहे. पनवेलमध्ये ७८ जागांपैकी ७१ जागा भाजप लढवणार असून, शिंदे गटाला ४ तर अजित पवार गटाला २ जागा सुटल्या आहेत. रिपाई आठवले गटाला १ जागा देण्यात आली. इथे महायुती अभंग राहिली. पनवेलमध्ये शेकाप-शरद पवार गट-उद्धव ठाकरेंची शिवसेना हे तिघे एकत्र आले आहेत. महाविकास आघाडीचे चित्र मात्र अद्याप स्पष्ट नाही. अलिकडच्या बैठकीनुसार ७८ जागांपैकी शेकाप सर्वाधिक ३८ ते ४०, उद्धव ठाकरेंची शिवसेना २०, शरद पवार गट २, मनसे ४, सपा १, आणि काँग्रेस ११ असे जागावाटप होऊ शकते. सोमवारी रात्री उशिरा किंवा मंगळवारी सकाळी निर्णय झालेला असेल, आणि उमेदवारी अर्ज दाखल होण्याच्या अखेरच्या दिवशी उमेदवारांच्या हाती एबी फॉर्मस ठेवले जातील, असे सूत्रांचे म्हणणे आहे.महानगरपालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास आजचा दिवस शिल्लक असताना सोमवारी युती आणि आघाड्यांचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## नव्या समीकरणांचा उदय

या निवडणुकीत राज्याच्या राजकारणात एकत्र असलेली भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस ही महायुती आणि काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (उद्धव ठाकरे) यांची महाविकास आघाडी अनेक ठिकाणी फुटली आहे. काही ठिकाणी नवी समीकरणे तयार झाली आहेत. पुणे, नाशिक, सोलापूर, अमरावती, अकोला नवी मुंबई, मीरा भाईंदरमध्ये भाजपा आणि शिवसेनेच्या युतीची चर्चा निष्फळ ठरली आहे.

# मी शरद पवारांची साथ सोडली कारण

# प्रशांत जगताप यांनी नेमकं काय काय सांगितलं?

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रशांत जगताप यांनी नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिली. त्यानंतर त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. काँग्रेसमध्ये आपण का गेलो? शरद पवारांची साथ का सोडली? राजकारण कसं बदलताना दिसलं आणि आपण २६ वर्षे ज्या पक्षात होतो तो पक्ष सोडण्याचा निर्णय का घेतला? याबाबत प्रशांत जगताप यांनी सविस्तर भूमिका मांडली आहे.**

माणसं बदलतात, पण त्यांच्या विचारधारा बदलता कामा नये. शरद पवारांची साथ सोडल्याची खंत मला नाही. अमुक आमचं दैवत, अमुक आमचं श्रद्धास्थान आहे अशा गप्पा मी मारत नाही. मी काँग्रेसमध्ये सहभागी झालो आहे. पण मी माझ्या कार्यालयात शरद पवारांबरोबरचा फोटो कायम ठेवला आहे. कारण त्यांच्याकडे पाहूनच मी राजकारणात आलो. आता त्या पक्षातून मी बाहेर पडलो आहे पण ही सोनेरी आठवण म्हणून फोटो जपला आहे. शरद पवारांना मी जे मानतो ते स्थान आजही माझ्या मनात कायम आहे असंही प्रशांत जगताप म्हणाले आहेत.प्रशांत जगतापसारखे असंख्य लोक येतात आणि जातात. पण पक्ष संपत नाही. मी



राष्ट्रवादी पक्षात होतो तेव्हा मी पक्ष बांधणीसाठीच काम केलं. पण मी जेव्हा बाहेर पडलो तेव्हा कुठलीही आदळआपट केली नाही. माझा विषय इतकाच होता की २० ते २५ दिवसांत ३६० अंशांचा अँगल बसला. त्यानंतर मी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. मी फोडाफोडी करणार नाही, टीका करणार नाही हे मी सांगितलं होतं. त्या भूमिकेवर मी ठाम आहे. मी २६ वर्षे त्या पक्षात होतो. आता मी दुसऱ्या मार्गावर जाण्याचा निर्णय घेतला. पण मी वेगळ्या विचारधारेच्या पक्षात आलो नाही. मी भाजपात गेलो नाही. मी काँग्रेसमध्ये सहभागी झालो. असं प्रशांत जगताप यांनी म्हटलं आहे. बीबीसी मराठीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे भाष्य केलं आहे.सुप्रिया सुळे मोठ्या नेत्या आहेत. त्यांनी जे काही भाष्य केलं, जो निर्णय घेतला त्यावर मला आक्षेप घ्यायचा नाही. मी एकत्र कुटुंब पद्धतीचा पुरस्कर्ता आहे. माझ्याही घरात १० लोक आम्ही एकत्र राहतो. त्यामुळे कुटुंब आणि पक्ष एक होत असतील तर हरकत नाही. महाविकास आघाडी म्हणून निवडणुकीला सामोरं जायला पाहिजे इतकंच मी म्हणत होतो. पुणेकरांनाही दिसत होतं की महायुतीने शहराचं वाटोळं केलं त्यामुळे महाविकास आघाडीच पर्याय आहे. त्यामुळे टीमही उभी केली होती.

## काय म्हणाले प्रशांत जगताप?

आता सगळ्या गदारोळात बऱ्याच गोष्टींची शकलं उडतील असं वाटलं होतं. मी पक्षात राहिल्याने त्यांना तो निर्णय घेणं अवघड होत असेल तर आपण बाहेर पडलेलं चांगलं याचा विचार करुन मी बाहेर पडलो." असंही प्रशांत जगताप म्हणाले.प्रशांत जगताप यांनी नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिली.

## एस. जयशंकर उद्या ढाका दौऱ्यावर

## खालिदा झियांच्या अंत्यसंस्कारांसाठी राहाणार उपस्थित

# बांगलादेशशी बिघडलेले संबंध सुधारणार?

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि बांगलादेश यांच्यामधील संबंधांमध्ये गेल्या काही दिवसांपासून तणाव वाढला आहे. यादरम्यान भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर ३१ डिसेंबर रोजी बांगलादेशच्या माजी पंतप्रधान आणि 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी'च्या (BNP) अध्यक्षा खालिदा झिया यांच्या शासकीय अंत्यसंस्काराला उपस्थित राहणार आहेत. बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान खलिदा झिया यांचं मंगळवारी सकाळी ६ च्या सुमारास निधन झालं.**

## सरकारने टाकलेले महत्त्वाचे पाऊल





त्या ८० वर्षांच्या होत्या. बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीनं सोशल मीडियावर पोस्ट करून त्यांच्या निधनाचं वृत्त जाहीर केलं. खालिदा झिया यांचे निधन अशा वेळी झाले आहे, जेव्हा त्यांचे सुपुत्र आणि 'बीएनपी' पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष तारिक रेहमान नुकतेच १७ वर्ष देशाच्या बाहेर राहिल्यानंतर बांगलादेशात परतले आहेत. खलिदा झिया या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या अध्यक्षा होत्या. रेहमान २५ डिसेंबर रोजी बांगलादेशमध्ये परतल्यानंतर त्यांनी पक्षाचं काम पाहायला सुरुवात केली आहे. आता खलिदा झिया यांच्या निधनानंतर रेहमान हेच पक्षाचे नवे अध्यक्ष होण्याची शक्यता आहे.

सध्या रेहमान पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष आहेत. अवघ्या दोन महिन्यांत बांगलादेशमध्ये १२ फेब्रुवारी रोजी सार्वत्रिक निवडणुका पार पडणार आहेत. त्याआधीच खलिदा झिया यांचं निधन झाल्यामुळे याचा बांगलादेशातील आगामी राजकीय समीकरणांवर नेमका कोणता प्रभाव पडणार, याबाबत राजकीय विश्लेषकांकडून अंदाज लावले जात आहेत.गेल्या वर्षी झालेल्या विद्यार्थी आंदोलनानंतर शेख हसीना यांना सत्तेतून खाली खेचण्यात आले.

तेव्हापासून भारत-बांगलादेश संबंधांमध्ये मोठा दूरावा आल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान दोन्ही देशांमधील सध्याच्या या तणावपूर्ण संबंधांच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशबरोबर पुन्हा चांगले संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने भारत सरकारने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.खलिदा झिया या तीन वेळा बांगलादेशच्या पंतप्रधान होत्या. त्यात १९९१ ते ९६, १९९६ साली काही काळासाठी तर २००१ ते ०६ या काळात त्यांनी बांगलादेशच्या पंतप्रधानपदाची जबाबदारी सांभाळली. खालिदा झिया यांनी

## चीनशी संबंध अधिक घट्ट

दिवसांपासून तणाव वाढला आहे. यादरम्यान भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर ३१ डिसेंबर रोजी बांगलादेशच्या माजी पंतप्रधान आणि 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी'च्या (BNP) अध्यक्षा खालिदा झिया यांच्या शासकीय अंत्यसंस्काराला उपस्थित राहणार आहेत. बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान खलिदा झिया यांचं मंगळवारी सकाळी ६ च्या सुमारास निधन झालं.

त्यांच्या कार्यकाळांमध्ये चीनशी संबंध अधिक घट्ट केले. ज्यामुळे भारताची चिंता वाढली. त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात देखील बांगलादेशचा कल चीनकडे अधिक राहिला, यामुळे चीन हा बांगलादेशला लष्करी साहित्याचा पुरवठा करणारा मुख्य देश बनला. मोहम्मद युनुस यांनी भारताला अंतर दिल्यानंतर बांगलादेशची पाकिस्तान आणि चीन यांच्याशी वाढत असलेली जवळीक भारतासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. झिया यांचे पुत्र रेहमान आगामी बांगलादेश निवडणुकीत पंतप्रधानपदाचा चेहरा आहेत. या सर्व घडामोडींदरम्यान त्यांनी केलेली विधाने देखील चर्चेत आहे. मे महिन्यात तारिक रेहमान यांनी लोकांनी निवडून दिलेले सरकार नसताना, दीर्घकालीन परराष्ट्र धोरणाबाबतचे निर्णय घेणाऱ्या युनूस यांच्या अंतरिम सरकारच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर ढाका येथील एका सभेत त्यांनी स्पष्ट केले की, बांगलादेश भारत किंवा पाकिस्तान यांपैकी कोणाशीही जास्त जवळीक ठेवणार नाही.

"दिल्ली आणि पिंडीही (रावळपिंडी) नाही, आमच्यासाठी सर्वात आधी बांगलादेश," अशी घोषणा केली.इतकेचन नाही तर रहमा यांनी भारत विरोधी जमात-ए-इस्लामी सारख्या राजकीय ताकदींवरही टीका केली. त्यांनी १९७१ च्या युद्धादरम्यान जमात-ए-इस्लामीने पाकिस्तानला दिलेल्या समर्थनाचा दाखला देत त्यांच्यावर ही टीका केली. जमात-ए-इस्लामी हा पक्ष एकेकाळी बीएनपीचा सहकारी होता.

# पश्चिम बंगालमध्येही घुसखोरीचा मुद्दा

## अमित शहांचा काँग्रेसपाठोपाठ ममता बॅनर्जींवर हल्लाबोल


।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आसामपाठोपाठ पश्चिम बंगालमध्येही घुसखोरीचा मुद्दा उपस्थित करताना विरोधी पक्षांना दोषी ठरवले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या बांगलादेशातून होणाऱ्या घुसघोरीला मदत करत आहेत, असा आरोप शहा यांनी केला.**

यामुळे गेल्या काही वर्षात राज्याची लोकसांख्यिकी धोकादायक प्रकारे बदलली असल्याचा दावा त्यांनी केला. शहा सोमवारी आसामच्या दौऱ्यावर असताना त्यांनी राज्यात बांगलादेशींच्या घुसखोरीबद्दल काँग्रेसला जबाबदार ठरवले होते.

पश्चिम बंगाल आणि आसाम या दोन्ही राज्यांमध्ये पुढील वर्षाच्या सुरुवातीला विधानसभा निवडणुका होत आहेत. कोलकात्यामध्ये पत्रकार परिषदेत बोलताना शहा म्हणाले की, पश्चिम बंगालमधील जनता घुसखोरीच्या मुद्द्यावर चिंतित आहे. आम्हाला २०२६मध्ये दोन-तृतियांश बहुमताने सत्ता मिळाल्यावर आम्ही ही घुसखोरी संपवू असा दावा शहा यांनी केला. ते म्हणाले, की एप्रिलमध्ये विधानसभा निवडणुका होतील आणि घुसखोरांना देशाबाहेर काढणे हा निवडणुकीतील



महत्त्वाचा मुद्दा असेल.जनतेने भाजपला सत्तेत आणायचे ठरवले आहे, त्यामुळे १५ एप्रिल २०२६नंतर पश्चिम बंगालमध्ये भाजप सत्तेत येईल, असा विश्वास शहांनी व्यक्त केला. या राज्यातील घुसखोरी थांबवण्यासाठी मजबूत राष्ट्रीय जाळे उभारले जाईल अशी घोषणा त्यांनी केली.माणसे सोडा, पक्ष्यांनाही ओलांडता येणार नाही अशा प्रकारच्या मजबूत जाळ्याची आम्ही रचना करू. आम्ही केवळ घुसखोरी थांबवणार नाही तर सर्व घुसखोरांना निवडून देशाबाहेर

## ५० जागाही मिळणार नाहीत!

यामुळे गेल्या काही वर्षात राज्याची लोकसांख्यिकी धोकादायक प्रकारे बदलली असल्याचा दावा त्यांनी केला. शहा सोमवारी आसामच्या दौऱ्यावर असताना त्यांनी राज्यात बांगलादेशींच्या घुसखोरीबद्दल काँग्रेसला जबाबदार ठरवले होते. पश्चिम बंगाल आणि आसाम या दोन्ही राज्यांमध्ये पुढील वर्षाच्या सुरुवातीला विधानसभा निवडणुका होत आहेत.

काढण्याचे कामही बंगालमधील भाजप सरकार करेल.अमित शहा राज्यात घुसखोरीच्या मुद्द्यावर असत्याचा प्रचार करत आहेत आणि भाजपला दोन-तृतियांश बहुमत मिळेल असे निराधार दावे करत आहेत, अशी टीका तृणमूल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे शिक्षणमंत्री ब्रात्य बसू यांनी केली. "बहुमताविषयी शहा यांचे दावे पोकळ आहेत, त्यांना ५० जागाही मिळणार नाहीत," असे बसू म्हणाले.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आसामपाठोपाठ पश्चिम बंगालमध्येही घुसखोरीचा मुद्दा उपस्थित करताना विरोधी पक्षांना दोषी ठरवले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या बांगलादेशातून होणाऱ्या घुसघोरीला मदत करत आहेत

# वैयक्तिक आयुष्यात मुल न होऊ देण्याचा निर्णय



मनोरंजन विश्वातल्या काही कलाकारांनी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात मुल न होऊ देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयासाठी त्यांची वैयक्तिक कारणं आहेत. एका प्रसिद्ध बॉलीवूड गायिकेनंसुद्धा तिच्या वैयक्तिक आयुष्यात मुल न होऊ देण्याचा निर्णय घेतला आहे. ही गायिका म्हणजे नेहा भसीन.आपल्या अनेक लोकप्रिय गाण्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या गायिका नेहा भसीननं नुकत्याच एका मुलाखतीत तिच्या वैयक्तिक आयुषयामधील मुल होऊ न देण्याचा निर्णयाबद्दल सांगितलं. यावेळी नेहानं आणि तिचा पती, संगीतकार समीर उद्दीन, यांनी मुलं न होण्याचा निर्णय जाणीवपूर्वक घेतला असल्याचंदेखील सांगितलं. रश्मी देसाईच्या RASHAMI KE DIL SE DIL TAK पॉडकास्टमध्ये नेहाने सांगितलं की, पती अणि तिला दोघांनाही कधीच स्वतःची मुलं हवी होती असं वाटलं नाही. या निर्णयामागे कोणतं ठराविक कारणही नाही, असंही तिनं स्पष्ट केलं. नेहा म्हणाली, “आम्हाला असं वाटतं की, आमचं प्रेम आणि आमच्या भावना या आमच्यापुरत्याच ठेवून हा प्रवास संपवायचा आहे. आमच्यासाठी हा निर्णय पूर्णपणे वैयक्तिक आहे आणि आम्ही तो शांतपणे स्वीकारला आहे.”काम आणि नातेसंबंध यांचा समतोल साधण्याबाबत बोलताना नेहाने तिचं मत व्यक्त केलं. ती म्हणाली की, तिच्यासारख्या आणि समीरसारख्या लोकांनी कदाचित लग्न करू नये, असं तिला वाटतं, पण ती हे प्रेमानं म्हणाली. नेहाच्या मते, ती आणि समीर कुणाकडून कौतुक मिळावं म्हणून काम करणारे लोक नाहीत. त्यांच्या आयुष्यात सर्जनशीलता (क्रिएटिव्हीटी) हेच पहिलं प्रेम आहे आणि बाकी सगळं त्यानंतर येतं. नेहाने हेही सांगितलं की तिच्या दोघांच्या नात्यात तिला कधीही गैरसमज झाल्यासारखं वाटलं नाही. याबद्दल “आयुष्यात अनेकदा आपल्याला समजून घेतलं जात नाही, असं वाटत असलं, तरी समीरबरोबरच्या नात्यात तिला कधीच असं जाणवलं नाही”, असं नेहा म्हणाली. पुढे ती म्हणाली, “तो माझ्यातल्या काही त्रुटी स्वीकारतो, तसंच मीही त्याच्यातल्या काही गोष्टी स्वीकारल्या आहेत. उदाहरणार्थ, समीर रात्री ४-५ वाजेपर्यंत काम करत राहतो. काम नसतानाही तो काहीतरी करतच असतो. तुम्ही त्याला जिथे सोडाल, तिथेच तो १२ तासांनंतरही बसलेला दिसेल.

# दिव्याचा पार पडला साखरपुडा



‘लक्ष्मी निवास’ ही ‘झी मराठी’वरील मालिका सध्या चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेत जान्हवीची भूमिका अभिनेत्री दिव्या पुगावकर साकारत आहे. काही दिवसांपूर्वीच मालिकेत जान्हवी आणि जयंत यांचा भव्यदिव्य लग्नसोहळा पाहायला मिळाला होता. मात्र, आता जान्हवीची भूमिका साकारणारी दिव्या खऱ्या आयुष्यात नव्या प्रवासाला सुरुवात करत आहे. दिव्या पुगावकरच्या घरी सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. नुकतेच तिच्या मेहंदी सोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. आता अभिनेत्रीचा साखरपुडा पार पडल्याची माहिती समोर येत आहे. दिव्याने साखरपुड्यात मराठमोळा लूक केल्याचं फोटोंमध्ये पाहायला मिळत आहे.हिरव्या रंगाची सुंदर अशी साडी, हातात हिरवा चुडा, गळ्यात साडीवर शोभेल असा नेकलेस, केसात गजरा असा पारंपरिक लूक दिव्याने साखरपुड्यात केला होता. अभिनेत्रीने साखरपुड्यात आपल्या होणाऱ्या नवऱ्यासह सुंदर असं फोटोशूट देखील केलं.दिव्याच्या होणाऱ्या नवऱ्याचं नाव अक्षय घरत असं आहे. ‘लक्ष्मी निवास’ ही ‘झी मराठी’वरील मालिका सध्या चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेत जान्हवीची भूमिका अभिनेत्री दिव्या पुगावकर साकारत आहे.

# ठरलं तर मग : सायली-अर्जुनची हकालपट्टी!



‘ठरलं तर मग’ मालिकेत सध्या प्रतिमाने पुढाकार घेऊन अर्जुन-सायलीचं लग्न लावून दिल्याचा सीक्वेन्स चालू आहे. सुरुवातीला अर्जुन आणि प्रियाचं लग्न होत असताना अचानक लग्नात बॅण्डवाल्याच्या रुपात सायली एन्ट्री घेते. “माझ्या नवऱ्याशी काहीही झालं तरी मीच लग्न करणार” असं सायली प्रियाला ठणकावून सांगते. यावेळी सायलीला खंबीरपणे साथ देते ती प्रतिमा... अर्जुन सुद्धा बायकोच्या बाजूने उभा राहून प्रियाला खडेबोल सुनावतो. सायली लग्नाच्या मंडपात आल्यावर प्रतिमा पूर्णा आजीला वचन मागे घ्यायला भाग पाडते. या सगळ्या गोष्टी पाहून प्रिया प्रचंड संतापते आणि सायलीला उलटं बोलू लागते. इतकंच नव्हे तर, प्रिया सायलीबद्दल भर मांडवात आक्षेपार्ह शब्द वापरते. प्रियाचं हे रुप पाहून प्रतिमा संतापून तिला कानाखाली वाजवते. तसेच यापुढे, “सायलीबद्दल एकही अपशब्द बोलू नकोस, असं करून तू स्वत:ची लायकी दाखवत आहेस” असंही ती प्रियाला बजावते. “सायली देखील माझ्या मुलीसारखी आहे, तिने माझ्यासाठी जे काही केलंय ते खूप मोठं आहे” असं बोलून प्रतिमा सर्वांची समजूत काढते आणि अर्जुन-सायलीचं लग्न लावून देते.लेकीचं कन्यादान करण्यासाठी मधुभाऊ यावेळी मांडवात येतात. आपल्या लेकीचा हात ते अर्जुनच्या हाती सुपूर्द करतात. मिसेस सायलीशी पुन्हा एकदा लग्न होणार... या विचाराने अर्जुन खूपच सुखावतो. तो गुरुजींना पुन्हा एकदा नव्याने सगळे विधी सुरू करा असं सांगतो. मालिकेत खरा ट्विस्ट अर्जुन-सायलीच्या लग्नानंतर येणार आहे. अर्जुन आणि सायली लग्नानंतर सुभेदारांच्या घरी जातात. याठिकाणी सुनेचं स्वागत न करता दोघांचीही हकालपट्टी करण्याची तयारी सुरू असते. अर्जुन-सायली गाडीतून उतरून सुभेदारांच्या पूर्णानिवासच्या प्रवेशद्वाराजवळ उभे राहतात. यावेळी प्रताप दोघांनाही घराबाहेर काढतो. सायलीचं सामान घराबाहेर फेकलं जातं. सायली आणि अर्जुनचं लग्न सुभेदार कुटुंबीय स्वीकारत नाहीत.“आम्हाला या मुलीशी कोणताही संबंध जोडायचा नाहीये.

# ‘शिवा’ फेम शाल्व किंजवडेकरचे वक्तव्य चर्चेत



शिवा’(SHIVA) ही मालिका लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेली आहे. या मालिकेत आशू ही प्रमुख भूमिका साकारणारा अभिनेता शाल्व किंजवडेक घराघरांत पोहोचला आहे. मालिकेबरोबरच अभिनेता त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेदेखील मोठ्या चर्चेत आहे. शाल्वचे काही दिवसांपूर्वीच लग्न झाले आहे. श्रेया डफळापूरकर असे त्याच्या पत्नीचे नाव आहे. सहा वर्षे लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर त्यांनी लग्नगाठ बांधली आहे. आता मात्र अभिनेत्याने एका मुलाखतीत केलेले वक्तव्य चर्चेचा विषय ठरत आहे.शाल्व किंजवडेकर व श्रेया डफळापूरकर यांनी नुकतीच राजश्री मराठीला मुलाखत दिली. या मुलाखतीत शाल्व व श्रेया यांनी त्यांच्या नात्याबद्दल, लग्नानंतर काय बदल झाले, याबरोबरच त्यांची ओळख कशी झाली होती, यावर वक्तव्य केले. या सगळ्यात शाल्वने या मुलाखतीत केलेले वक्तव्य चर्चेत आहे. या मुलाखतीत श्रेयाला विचारले की, शाल्वचे आई-वडील तुझे मित्र आहेत का? यावर बोलताना श्रेयाने म्हटले की, जेव्हा मला पाठिंब्याची किंवा आधाराची गरज असते व ते माझ्यासोबत असतात ते माझे मित्र बनतात. नंतर ते आई-वडील आहेत. ते दोन्ही भूमिका सांभाळून घेतात.माझी सासू माझी खूप जवळची मैत्रीण आहे. दिवसातून एकदा बोलणं झाल्याशिवाय आमचा दिवसच जात नाही. जर मला काही माहीत असेल तर ते तिला माहीत असतंच. जर मला कोणी काही सांगत असेल तर ते माझ्या सासूला माहीतच असते. मी तिला ते सांगतेच. श्रेयाच्या या बोलण्यावर शाल्वने म्हटले की, मलाही कधीकधी ईर्ष्या वाटते. या दोघींचं काय चाललंय, या काय बोलतात किंवा चर्चा करत आहेत, असं मला कधी कधी वाटतं. पुढे श्रेयाने म्हटले की, माझी सासू खूप गोड व्यक्ती आहे. असे म्हणत श्रेयाने तिच्या सासूचे कौतुक केले आहे.दरम्यान, शाल्व सध्या ‘शिवा’ या मालिकेत प्रमुख भूमिकेत दिसत आहे. त्याने आशू ही भूमिका साकारली आहे, तर शिवाच्या भूमिकेत पूर्वा कौशिक दिसत आहे. दोन्ही कलाकारांनी त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांचे मनोरंजन करत त्यांची मने जिंकली आहेत.

## दीप्तीने घडवला इतिहास!

## टीम इंडियाचा श्रीलंकेला ५-० ने व्हाईटवॉश

# टीम इंडियाचा दमदार विजय!

## श्रीलंका विजयापासून १५ धावा दूर



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना तिरुवनंतपुरमच्या ग्रीनफिल्ड स्टेडियममध्ये पार पडला. या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या डावात भारतीय संघाला सुरुवातीला मोठे धक्के बसले होते. पण हरमनप्रीत कौरच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर भारतीय संघाने ७ गडी बाद १७५ धावांपर्यंत मजल मारली. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेकडून हसिनी परेरा आणि इमेशा दुलानीने दमदार अर्धशतकं झळकावली. पण श्रीलंकेचा संघ विजयापासून १५ धावा दूर राहिला. ही मालिका भारतीय संघाने ५-० ने आपल्या नावावर केली.**

या सामन्यात श्रीलंकेला विजयासाठी १७६ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या श्रीलंकेला सुरूवातीलाच मोठा धक्का बसला. संघाची कर्णधार चमारी अटापटू अवघ्या २ धावांवर माघारी परतली. हसिनी परेराने ६५ धावांची खेळी केली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या इमेशा दुलानीने ५० धावांची खेळी केली. तर निलाक्षी डी सिल्वा अवघ्या ३ आणि कविशा दिल्हारीने ५ धावांवर माघारी परतली. शेवटी श्रीलंकेला १६० धावांपर्यंत मजल मारता आली.या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिले होते. या सामन्यात स्मृती मानधनाला विश्रांती देण्यात आली. तिच्या जागी जी कमलिनीचा संघात समावेश करण्यात आला होता. पण तिला या संधीचा फायदा घेता आला नाही. कमलिनी अवघ्या १२ धावा करत माघारी परतली. तर गेल्या २ सामन्यात लागोपाठ अर्धशतक झळकावणारी शफाली वर्मा अवघ्या ५ धावा करत माघारी परतली. हरलीन देओलला अवघ्या १३ धावा करता आल्या. भारतीय संघाला सुरूवातीलाच मोठे धक्के बसले होते. पण कर्णधार हरमनप्रीत कौरने एक बाजू धरून ठेवली होती. हरमनप्रीतने ६८ धावांची दमदार खेळी केली. मोठे फटके खेळण्यासाठी ओळखली जाणारी ऋचा घोष या सामन्यात अवघ्या ५ तर दीप्ती शर्मा अवघ्या ७ धावांवर माघारी परतली.हरमनप्रीत कौरने अमनजोत कौरसोबत मिळून महत्वपूर्ण भागीदारी केली. तिने २१ धावा केल्या. तर शेवटी अरूंधती रेड्डीने नाबाद २७ धावा करत संघाची धावसंख्या ७ गडी बाद १७५ धावांपर्यंत पोहोचवली. येत्या काही महिन्यात भारतीय संघ टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. त्यामुळे प्रत्येक मालिका ही सरावाच्या दृष्टीने भारतीय संघासाठी अतिशय महत्वाची असणार आहे. श्रीलंकेविरूद्ध झालेल्या सामन्यात भारतीय संघाने दमदार खेळ केला. पाचही सामन्यात फलंदाज आणि गोलंदाजांनी आपली भूमिका योग्यरित्या पार पाडली. यासह भारतीय संघाने ही मालिका ५-० ने आपल्या नावावर करून वर्षाचा शेवट गोड केला आहे.भारत आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना तिरुवनंतपुरमच्या ग्रीनफिल्ड स्टेडियममध्ये पार पडला. या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या डावात भारतीय संघाला सुरुवातीला मोठे धक्के बसले होते. पण हरमनप्रीत कौरच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर भारतीय संघाने ७ गडी बाद १७५ धावांपर्यंत मजल मारली. श्रीलंकेकडून हसिनी परेरा आणि इमेशा दुलानीने दमदार अर्धशतकं झळकावली. पण श्रीलंकेचा संघ विजयापासून १५ धावा दूर राहिला. ही मालिका भारतीय संघाने ५-० ने आपल्या नावावर केली.

### श्रीलंकेचा सुपडा साफ

सुरूवातीलाच मोठा धक्का बसला. संघाची कर्णधार चमारी अटापटू अवघ्या २ धावांवर माघारी परतली. हसिनी परेराने ६५ धावांची खेळी केली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या इमेशा दुलानीने ५० धावांची खेळी केली. तर निलाक्षी डी सिल्वा अवघ्या ३ आणि कविशा दिल्हारीने ५ धावांवर माघारी परतली. शेवटी श्रीलंकेला १६० धावांपर्यंत मजल मारता आली.या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिले होते.

# सूर्यकुमार यादव मला खूप मेसेज करायचा!

## खुशी मुखर्जीचे भारताच्या कर्णधाराबद्दल धक्कादायक वक्तव्य





। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचा टी-२० संघ सध्या आगामी टी-२० विश्वचषकाच्या तयारीत व्यस्त आहे. टी-२० विश्वचषक २०२६ येत्या फेब्रुवारीमध्ये होणार आहे. भारतीय संघाचं नेतृत्त्व करण्याची जबाबदारी सूर्यकुमार यादवच्या खांद्यावर आहे. सूर्यकुमार यादवचा टी-२० कर्णधार म्हणून उत्कृष्ट रेकॉर्ड राहिला आहे. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने एकही टी-२० मालिका गमावलेली नाही.**

पण यादरम्यान आता अभिनेत्रीने सूर्यकुमार यादवबाबत वादग्रस्त वक्तव्य करत सर्वांचं लक्ष वेधलं आहे.सूर्यकुमार यादवबाबत वादग्रस्त वक्तव्य करणारी ही अभिनेत्री आहे, खुशी मुखर्जी. जी सोशल मीडियावर तिचे बोल्ड फोटो, व्हीडिओ तसेच तिच्या विचित्र वक्तव्यांमुळे चर्चेत असते. खुशी मुखर्जीला तिच्या विचित्र फॅशनमुळे अनेकदा ट्रोल केलं गेलं आहे. पण यावेळेस खुशी मुखर्जीने भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवबद्दल धक्कादायक वक्तव्य केलं आहे. तिच्या या वक्तव्याची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.एका संभाषणादरम्यान खुशी मुखर्जीला विचारण्यात आलं की तिला कोणता क्रिकेटपटू आवडतो आणि तिला कोणाला डेट करायला आवडेल? यावर उत्तर देताना ती म्हणाली, “मला कोणत्याच क्रिकेटपटूला डेट करायचं नाही. अनेक क्रिकेटपटू माझ्या मागे लागले होते. सूर्यकुमार यादव मला खूप मेसेज करायचा, पण आमच्यात आता फारसं बोलणं होत नाही. मला माझं नाव त्याच्याशी किंवा इतर कोणाशी जोडलेलं नकोय.”खुशी मुखर्जीच्या सूर्यकुमार यादववरील या वक्तव्याचा व्हीडिओ सगळीकडे व्हायरल होत आहे. पण सूर्यकुमार यादवने अद्याप यासंबंधित कोणतंही वक्तव्य केलेलं नाही.

### देविशाचा मंदिरात दर्शन

सूर्यकुमार यादव व त्याची पत्नी देविशा शेट्टी यांनी आज मंगळवारी श्री वेंकटेश्वरा स्वामी मंदिर तिरूपतीचं दर्शन घेतलं. वैकुंठ एकादशीनिमित्त सूर्या व देविशाचा मंदिरात दर्शन घेण्यासाठी जातानाचा व्हीडिओ समोर आला होता.सूर्यकुमार यादव दक्षिण आफ्रिकेविरूद्ध टी-२० मालिकेत अखेरचा खेळताना दिसला होता. ही मालिका भारताने ३-१च्या फरकाने जिंकली होती.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
दि. 31 डिसेंबर 2025
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## एस. बी. पाटील ज्युनिअर कॉलेजचे

# ‘नवरस’ वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न!

### शिक्षण विश्व : सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात कलात्मकता आणि सर्जनशीलते चा उत्कृष्ट समन्वय साधून ‘नवरस’ या थीमवर विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.**



यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, निवृत्त सैनिक अधिकारी डॉ. राजेंद्र मोरे, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्रतिनिधी डॉ. योगेश भावसार, सिनियर कॉलेजचे प्राचार्या डॉ. स्मृती पाठक, ज्यू. कॉलेजचे प्राचार्य संदीप पाटील, विद्यार्थी व पालक प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

दीप प्रज्वलन, सरस्वती वंदना, पाहुण्यांचे स्वागत, प्रास्ताविक, मार्गदर्शन, बक्षीस वितरण आणि ‘नवरस’ मध्ये नृत्य, नाटक, संगीत, स्कीट याचे सादरीकरण केले. उत्कृष्ट अभिनय करीत विद्यार्थ्यांनी रंग, राग आणि भावना यांचा अद्भुत संगम साधत रसिकांना खिळवून ठेवले. वीर, करुण, हास्य, रौद्र, अद्भुत, भयानक आणि शांती अशा विविध मानवी भाव भावनांचे अप्रतिम दर्शन ‘नवरस’ घडले. वर्षभरात विभागीय क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना चषक व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तसेच पोस्टर मेकिंग आणि दांडिया स्पर्धेत विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

कला, क्रीडा, संस्कृती, शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा उत्कृष्ट संगम म्हणजे एस. बी. पाटील ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला ‘नवरस उत्सव’ आहे अशा शब्दात पुणे जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी प्रशंसा केली.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, उद्योजक अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी संमेलनात सहभाग घेतला होता.

# कविता भोंगाळे-पाटील यांचा प्रभाग क्रमांक 5 मधून उमेदवारी अर्ज दाखल!

### निवडणूक जिंकण्याचा ठाम विश्वास; नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड | प्रभाग क्रमांक ५ मधून भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार कविता भोंगाळे-पाटील यांनी मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज अधिकृतपणे दाखल केला. यावेळी त्यांनी महापालिका निवडणूक जिंकण्याचा ठाम विश्वास व्यक्त केला.**



देशातील सर्वात मोठ्या पक्ष असलेल्या भाजपने मला उमेदवारी जाहीर केली याबद्दल मी त्यांचे आभार मानते. “माझ्या सामाजिक कार्याची ही पोहोचपावती आहे. नागरिकांचा विश्वास आणि आशीर्वाद माझ्या पाठीशी आहेत. त्यामुळे निश्चितच विजय मिळवू,” असे कविता भोंगाळे-पाटील यांनी सांगितले.

अर्ज दाखल करताना भारतीय जनता पार्टीच्या वतीने प्रभागात करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा तसेच आमदार श्री. महेशदादा लांडगे यांच्या माध्यमातून झालेल्या विकासाचा आढावा नागरिकांसमोर मांडण्यात आला. या कामांच्या जोरावर जनतेचे आशीर्वाद घेण्यात आले.

या वेळी नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसून आला. विशेष म्हणजे महिला भगिनी मोठ्या संख्येने स्वतःहून प्रचारात सहभागी होत असून, त्यांचा पाठिंबा उमेदवारासाठी बळ देणारा ठरत आहे.

एकूणच अर्ज दाखल करण्याच्या दिवशी उत्साही वातावरण दिसून आले असून, आगामी निवडणुकीत प्रभाग क्रमांक ५ मध्ये चुरशीची लढत होण्याची शक्यता आहे.

## पिंपरी-चिंचवड महानगर पालिका - चऱ्होली प्रभाग 3 मध्ये

# अनुराधा साळुंके यांना राष्ट्रवादी काँग्रेसची अधिकृत उमेदवारी!

## अर्ज दाखल; भाजपविरोधी आक्रमक धोरण; उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पाठिंबा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड | पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी चऱ्होली प्रभाग क्रमांक ३ मधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अनुराधा दीपक साळुंके यांची अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली असून त्यांनी आपला उमेदवारी अर्जही दाखल केला आहे**



महिला संघटनांचे सशक्तीकरण, प्रभागातील प्रलंबित विकासकामे, पाणीपुरवठा व नागरी सुविधांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर आधारित सादर केलेल्या ठोस 'अजेंड्या'च्या आधारे पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अनुराधा साळुंके यांची उमेदवारी अधिकृतपणे जाहीर केली. यावेळी ते म्हणाले, "पक्ष तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. कोणालाही घाबरण्याचे कारण नाही. आतापर्यंत केलेली विकासकामे नागरिकांपर्यंत पोहोचवा, मतदार नक्कीच तुमच्या पाठीशी उभे राहतील."



उमेदवारी जाहीर झाल्यानंतर बोलताना अनुराधा साळुंके म्हणाल्या, "राज्याचे उपमुख्यमंत्री आणि आमचे नेते अजित पवार यांनी माझ्यावर विश्वास दाखवला, याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे. पुढील काळात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विकासाच्या मुद्द्यांवर काम करत राहीन. शहराची प्रगती राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातूनच झाली आहे, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे."

चऱ्होली प्रभागातील पाणीपुरवठा, नागरी सुविधा तसेच महिलांशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच शहराच्या प्रगतीचा संकल्प पुढे नेण्यासाठी नागरिकांनी घड्याळाच्या चिन्हासमोरील बटन दाबून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहनही त्यांनी मतदारांना केले आहे.

उमेदवारी जाहीर होऊन अर्ज दाखल झाल्याने चऱ्होली प्रभाग क्रमांक ३ मध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून, निवडणूक लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी केली स्ट्रॉंग रूमची पाहणी

## निवडणूक साहित्य कक्षाची केली पाहणी; अधिकाऱ्यांना सूचना

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व अडथळाविरहीत पार पडावी, यासाठी महापालिका प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी अभिरक्षा कक्ष (STRONGROOM) तसेच निवडणूक साहित्य कक्षाची पाहणी केली.**



या पाहणीदरम्यान ईव्हीएम मशिन्सची साठवणूक, सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था तसेच वापरापूर्वी व वापरानंतरच्या प्रक्रियांची माहिती घेण्यात आली. मतदान केंद्रांपर्यंत ईव्हीएम मशिन्स व संबंधित साहित्य पोहोचवताना तसेच मतदानानंतर ती सुरक्षितरीत्या परत आणताना कोणतीही चूक किंवा निष्काळजीपणा होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना आयुक्त हर्डीकर यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी दिल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, नगर सचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार, कार्यकारी अभियंता सुनील पवार, अभिमान भोसले, संजय काशिद, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह निवडणूक विभागातील वरिष्ठ अधिकारी, संबंधित शाखांचे प्रमुख तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मतदानासाठी वापरण्यात येणारी ईव्हीएम यंत्रे व निवडणूक साहित्य महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बीड व कोल्हापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून पिंपरी येथे सुरक्षितरीत्या आणण्यात आली आहेत. पिंपरी येथे दाखल झाल्यानंतर सर्व वाहनांच्या सीलबंद स्थितीची खातरजमा करून राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ईव्हीएम यंत्रे अभिरक्षा कक्षामध्ये सुरक्षितरीत्या ठेवण्यात आली आहेत. या अभिरक्षा कक्षाची पाहणी करताना आयुक्त हर्डीकर यांनी ईव्हीएम मशिन्स हाताळताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करणे, मशिन्सच्या सीलिंग, तपासणी व चाचणी प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखणे, तसेच कोणतीही तांत्रिक अडचण उद्भवल्यास तत्काळ उपाययोजना करण्यासाठी सज्ज राहण्याचे निर्देश दिले. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांच्यात योग्य समन्वय असणे अत्यंत आवश्यक असून प्रत्येकाने आपली जबाबदारी गंभीरतेने व नियमानुसार पार पाडावी, असेही त्यांनी नमूद केले. तसेच निवडणूक साहित्याची योग्य नोंद, साठवणूक व वितरण प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये, याबाबतही खबरदारी घेण्याच्या सूचना देखील आयुक्त हर्डीकर यांनी दिल्या. याशिवाय, निवडणूक प्रक्रियेत सहभागी प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी नियमांचे पालन करून काम केल्यासच लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. तसेच महापालिका प्रशासनाच्या या तयारीमुळे पिंपरी चिंचवड शहरातील सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ शांततेत, सुरक्षित व यशस्वीरीत्या पार पडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046